# छंद पुष्परचनेचा - ९

या लेखापासून आपण पुष्परचनेमधील 'मुक्तरचना' या महत्वाच्या व लोकप्रिय प्रकाराची माहिती घेणार आहोत. मुक्तरचनेला जपानी भाषेत 'जियुका' असे म्हणतात. शोका किंवा मोरियाना अथवा कोणतीही पारंपारिक रचना करताना ठरविलेल्या नियमांच्या चौकटीत पुष्परचना कराव्या लागतात. मुक्तरचना करताना हे नियम बरेचसे शिथिल केलेले आहेत. सुरवातीला पारंपारिक रचना करायला शिकल्यानंतर फुले, पाने यांचा वापर कसा करायचा, पुष्पपात्रात फुले कशी लावायची, याचा थोडा सराव झाला की मग मुक्तरचनेकडे वळावे. मुक्तरचना करताना कल्पनाशक्तीला खूप वाव देता येतो. निसर्गातील पानाफुलांचे सतत निरीक्षण, वेगवेगळ्या पुष्पप्रदर्शनांना अभ्यासपूर्व भेट देणे इत्यादी गोष्टींचा उपयोग होतो.

मुक्तरचनेचेही दोन प्रकार आहेत. कुठल्या प्रकारचे साहित्य पुष्परचना करताना वापरले आहे, त्यानुसार हे वर्गीकरण केलेले आहे. नैसर्गिक मुक्तरचना व कृत्रिम गोष्टी वापरुन केलेली  मुक्तरचना असे हे दोन प्रकार !

जपानी पुष्परचना म्हटल्यावर नैसर्गिक ताजी फुले, पाने त्यात हवीतच ! परंतु 'नैसर्गिक मुक्तरचना' करताना फुले, पाने, फांद्या याबरोबर वाळलेले गवत, काड्या, वाळलेली पाने, तुरे, झाडाचे खोड, बांबूचा वापर, पाईन कोन असे काहीही उपयोगात आणता येते.

दुसऱ्या प्रकारामध्ये नैसर्गिक फुला-पानांबरोबर कोणतेही कृत्रिम मटेरियल वापरता येते. उदाहरणार्थ, रंगीत लेस, रिबीन, वायर्स, टाकाऊ सीडी, कागद, पुठ्ठा, पाईपचे तुकडे, मेणबत्ती, कोणतेही कृत्रिम शोभेचे साहित्य, मणी, मोती इत्यादी.



फोटो १

दोन्ही प्रकारच्या रचनांमध्ये पुष्पपात्र कसे व कोणते घ्यावे याबद्दल ठराविक असा नियम नाही. पुष्पपात्र हवेच असेही नाही. बांबू, पुठ्ठा, लाकूड, हॅण्डमेड पेपर, थर्मोकोल याची आपल्या कल्पनेने रचना अथवा मांडणी करून त्यात पुष्परचना करता येते. भिंतीवरील किंवा हँगिंग रचना करता येतात. एखादा विषय (थिम) घेऊन रचना करण्याची सुद्धा पद्धत आहे.

उदाहरणार्थ - ऋतु, उत्सव, प्रेम, रंगांची उधळण. मनातल्या भावना चित्रकार चित्रात उतरवतात त्याचप्रमाणे फुलांचे माध्यम वापरुन भावनेचा आविष्कार दाखविता येतो.

या रचनांचा आकार किती असावा हेही रचनाकाराच्या मनावर असते. अगदी ८ X ८ इंच आकारात बसणारी छोटी किंवा घरातील एखादी मोठी भिंत व्यापू शकेल एवढी मोठी रचना सुद्धा करता येते. ज्या लोकांनी आधी पारंपारिक रचनांचा अभ्यास केला आहे त्यांना या रचना करायला सहज जमते. त्याचप्रमाणे सवयीमुळे नवीन नवीन कल्पनाही सुचतात. मुक्त रचना करताना कल्पना सुचणे ही फार महत्वाची गोष्ट आहे. रचनेचा विषय ठरल्यावर त्यात काय साहित्य व कसे वापरायचे याचे नियोजन करुन रचना केली जाते. त्यासाठी २-३ वेळा सराव करुन रचनेला अंतिम स्वरुप देता येते. तसेच यात पारंपारिक पुष्परचनेचे नियम पाळावे लागत नसले तरी रंगसंगती, रचनेमध्ये निर्माण करायच्या रेषा व कोन, संपूर्ण रचनेचा तोल, फुले पाने लावण्याची पद्धत या गोष्टी महत्वाच्या आहेत.



फोटो २



फोटो ३

सोबत दिलेल्या नैसर्गिक मुक्तरचना पहा. फोटो १ व २ मध्ये सर्व साहित्य नैसर्गिक आहे. तर फोटो ३ मधील रचना ही वॉल हँगिंग रचना आहे. यामध्ये पांढऱ्या वायरचे गोल वापरले आहेत व मनीप्लँटचा वेल आणि जांभळी फुले असे थोडकेच मटेरिअल वापरुन सुबक रचना केली आहे.

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

**(मराठी विश्व, न्यूजर्सी यांच्या सौजन्याने)**

**इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर**

**asdssd@gmail.com**